77

# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर

गोपनिय

क्र.कक्ष-९/भावसे/तक्रार/प्रक्र.३४(१२-१२)/ 666 /१२-१३
नागपूर-४४० ००१, दिनांक : १६ जून, २०१२

**विषय :-** नागपूर वनविभागातील मंजूर कार्य आयोजनेप्रमाणे करण्यात आलेल्या कामाचे तपासणीबाबत.

**संदर्भ :-** १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील गोपनीय कार्यालयीन टिप्पणी क्रमांक No.पीसीसीएफ/(पी ॲण्ड एम)/पीओ/२५, दिनांक २५/०५/२०१२.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-९/भावसे/तक्रार/प्रक्र.३४(१२-१२)/६३६ दि.४ जून, २०१२.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), म.रा. नागपूर यांचे संदर्भ १ वरील कार्यालयीन टिप्पणी दिनांक २५/०५/२०१२ मध्ये नमुद मुद्यांचे गांभिर्य लक्षात घेता उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी व्हावी, या दृष्टिकोणातुन या कार्यालयाचे संदर्भ २ वरील पत्र दिनांक ४ जुन, २०१२ अन्वये श्री.सर्वेशकुमार, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी तसेच श्री. श्री.भगवान, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) या दोन अधिकाऱ्यांची समिती तयार करण्यात आली होती. श्री.सर्वेशकुमार,भावसे, हे रजेवर गेले आहेत. विषयाची गंभीरता व चौकशी पूर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेला मर्यादित कालावधी लक्षात घेता, आता या समितीमध्ये अंशत: बदल करून खालीलप्रमाणे समिती तयार करण्यात येत आहे.

१) श्री एस.के.सिन्हा, भावसे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना-पुर्व), नागपूर - अध्यक्ष

२) श्री श्रीभगवान, भावसे, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास),म.रा. नागपूर -सदस्य

३) श्री पी.डी. मसराम, विभागीय वन अधिकारी , नागपूर वनवृत्त, नागपूर - सदस्य सचिव

श्री टी.के.चौबे, भावसे, मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना, नागपूर आणि श्री एस.एच.पाटील, भावसे, मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, नागपूर हे समितीला चौकशीकामी सहकार्य करतील. तसेच या ज्ञापनाव्दारे प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), म.रा. नागपूर यांनी त्यांचे ज्ञापन क्रमांक प्रमुवसं (उवव्य)/स्वीस/४५, दिनांक १४.६.२०१२ अन्वये गठीत केलेली समिती निरस्त समजण्यात यावी.

२.० वरील समिती खालील विषयांवर चौकशी करेल.

१) नागपूर (प्रादेशिक), वनवृत्तात मंजुर कार्य आयोजनेनुसार अंमलबजावणीची सद्यस्थिती.

२) मंजुर कार्य आयोजनेच्या तुलनेत झालेल्या कामांमध्ये शासकीय निधीची अफरातफर (Mis-appropriation).

३.० समिती त्यांचा अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा.नागपूर यांना दोन आठवडयात सादर करेल.

**मसुदा प्र.मु.व.स.(वन बल प्रमुख)**
**म. रा. नागपूर यांचेकडून अनुमोदीत**

-सही-
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर/करिता

१६/६ (१) श्री एस.के.सिन्हा, भावसे,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना-पुर्व), नागपूर
(२) श्री.श्री.भगवान, भावसे
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
(३) श्री पी.डी. मसराम,
विभागीय वन अधिकारी (दक्षता), नागपूर वनवृत्त, नागपूर

प्रतिलिपी : प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी : प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), म.रा. नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक, कार्य आयोजना, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी : उप वनसंरक्षक, नागपूर/वर्धा/भंडारा/ गोंदीया यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. त्यांनी उपरोक्त समितीला सहकार्य करावे.

Office of the
Chief Conservator of Forests
Working Plan Nagpur
No...442..... Dt..21/06/2012

प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर/करिता

माहिती अधिकारी तथा
सहाय्यक वन संरक्षक
मुख्य वन संरक्षक कार्य आयोजना,
नागपूर यांचे कार्यालय